जलयुक्त शिवार अभियान हा कार्यक्रम राज्यातील “क” वर्ग नगरपालिका यांच्या क्षेत्रामध्ये राबविण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : जशिअ २०१६ / प्र.क्र. ३६१/ जल-७**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ डिसेंबर, २०१६

**पहा :** शासन निर्णय ,जलसंधारण विभाग, क्रमांक:जलअ-२०१४/ प्र.क्र. २०३/ जल-७ दिनांक ५.१२.२०१४

**प्रस्तावना:**

राज्यात वारंवार उदभवनाऱ्या टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून या बाबतचा शासन निर्णय या विभागाने दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी निर्गमित केलेला आहे. या अभियानांतर्गत दरवर्षी ५००० हजार टंचाईग्रस्त गावाची निवड करण्यात येऊन ५ वर्षात राज्यातील २५००० हजार गावे टंचाईमुक्त करण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. या अभियानातंर्गत विविध विभागाच्या योजना एकात्मिक पध्दतीने राबवावयाच्या असून त्याकरीता गांवाची निवड करण्याकरीता शासन पत्र दिनांक २ जानेवारी, २०१५ व दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ अन्वये खालील प्रमाणे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. या निकषांनुसार ग्रामीण भागातील गांवाची निवड करुन गावामध्ये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे करण्यात येत आहेत. तथापि “जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत नागरी क्षेत्रात येणाऱ्या नद्या / नाले/ ओढे यांचे खोलीकरण / रुंदीकरण आणि इतर बाबींचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावातील कामे ही पाणलोट विकास या माध्यमातून माथा ते पायथा या तत्वावर हाती घेण्यात येत आहेत. या तत्वावर कामे करत आसताना Area Treatment ची कामे प्रथम हाती घेण्यात येतात व Drainage Line Treatment ची कामे त्यानंतर हाती घेण्यात येतात. राज्यातील काही ग्रामपंचायतीची लोकसंख्या वाढल्याने लोकसंखेच्या तसेच गावातील शहरीकरणाचा विचार करुन अशा ग्रामपंचायतीचे नगरपालिका / नगर पंचायत क्षेत्रात रुपांतर करुन तेथे नगर पंचायती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही नगर विकास विभागाकडून करण्यात येते. तथापि अशा नव्याने रुपांतरीत झालेल्या क वर्ग नगर पंचायती क्षेत्रातील जमिनीचा कृषी प्रयोजनासाठीचा वापर देखील मोठया प्रमाणात असतो. सबब अशा क्षेत्रामध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविल्यास शेतकऱ्यांना याचा लाभ होईल. सबब क वर्ग नगर पंचायती क्षेत्रातील विकास आराखडया नुसार केवळ कृषी / शेती वापरासाठी राखीव करण्यात आलेले क्षेत्र विचारात घेऊन अशा क्षेत्राचा पाणलोट विकास धर्तीवर व माथा ते पायथा या तत्वावर जलयुक्त शिवार अभियानातंर्गत जलसंधारणाच्या / मृदसंधारणाच्या विविध योजना अभिसरणाद्वारे एकात्मिकरित्या राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियान राबविण्या संदर्भात वेळोवेळी विविध प्रयोजनार्थ घेण्यात आलेले निर्णय सदर क वर्ग नगरपालिका क्षेत्रात योजना राबविण्या संदर्भात लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६१२३११४५०५१४७२६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vinod S Wakhare
Date: 2016.12.31 16:03:53 +05'30'

**( वि. सि.वखारे )**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई .
४. सर्व सन्मानीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
५. मा. मंत्री (जलसंधारण ) यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्यमंत्री (जलसंधारण ) यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृष व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई .
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
१०. सर्व अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग ( मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई .
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे- ४११ ००१.
१२. सर्व विभीय आयुक्त.
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे- ४११ ००१.
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण ) पुणे.
१६. मुख्य अभियंता, विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
१७. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१८. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी / अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता),
२१. सर्व जिल्हाधिकारी.
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

२३. महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (लेखा परिक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय.
२७. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
२८. सर्व अधिक्षक अभियता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
३०. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण).
३१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.,
३२. सर्व मंत्रालयीन विभाग
३३. सर्व सह सचिव / उपसचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५. जल-७, निवडनस्ती.